आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत....

१५०-

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक: आस्था.1093/प्र.क्र.261/का.15,
मंत्रालय विस्तार, मुंबई 400 032, दिनांक 29 डिसेंबर, 1993.

**वाचा :-** (1) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-टीएसपी 1086/8710/प्र.क्र.31/कार्यासन-5, दिनांक 9 मार्च, 1990.

(2) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक: आस्था.1092/प्र.क्र.58/कार्यासन-15, दिनांक 2 मे, 1992.

(3) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक- आस्था.1093/प्र.क्र.202/कार्यासन-15, दिनांक 9 नोव्हेंबर, 1993.

**शासन निर्णय :-** प्रस्तावनेत क्रमांक-2 येथे उल्लेखिलेल्या शासन निर्णयान्वये आदिवासी क्षेत्रातील अतिदुर्गम भागातील 13 जिल्हयांतील 1472 विनिर्दिष्ट गावांत कार्यरत असणा-या अधिकारी व कर्मचा-यांना दिनांक 1 मे, 1992 पासून पुढील दराने प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता :-

| वेतनश्रेणी | दरमहा रुपये |
|---|---|
| मूळ वेतन रु. 950/- पेक्षा कमी | रु.100/- |
| 950/- ते 1499 | रु.200/- |
| 1500/- ते 1999 | रु.300/- |
| 2000/- ते 2999 | रु.400/- |
| 3000/- ते अधिक | रु.500/- |

2. वरील दराने प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी 13 जिल्हयांतील अतिदुर्गम क्षेत्रातील 1472 गावे निश्चित करण्यात आली होती. वरील दराप्रमाणे देय प्रोत्साहन भत्ता 1 मे, 1992 पासून अंमलात येऊन आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यन्त अंमलात राहील असेही उक्त शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले होते.

3. अमरावती जिल्हयाच्या मेळघाट परिसरात आणि ठाणे जिल्हयाच्या मोखाडा परिसरात नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी बालमृत्यूच्या संदर्भात आदिवासी क्षेत्रात काम करणा-या प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्याचा आणि आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शासकीय कर्मचारी आणि अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. प्रकल्प यंत्रणेच्या बळकटीकरणाचे आदेश प्रस्तावनेत उल्लेखित क्रमांक 3 च्या शासन निर्णयाव्दारे निर्गमित करण्यात आले आहेत.

4. आता आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणा-या शासकीय कर्मचारी आणि अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यासंबंधी शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(1) प्रस्तावनेत क्रमांक-1 येथे उल्लेखित दिनांक 9 मार्च, 1990 च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र निर्धारित करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याच्या ठाणे,रायगड,नाशिक,धुळे, जळगांव,अहमदनगर,पुणे,नांदेड,अमरावती,नागपूर,भंडारा,यवतमाळ,चंद्रपूर आणि गडचिरोली या 14 जिल्हयांतील एकूण 6962 गावे व 13 शहरे आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यातील 5691 गावे व 13 शहरे मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रात (अनुसूचित क्षेत्रात) मोडत असून 1271 गावे अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात मोडतात. प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात येत असलेला प्रोत्साहन भत्ता या 6975 गावांत/शहरांत प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कर्मचारी आणि अधिकारी यांना अनुज्ञेय राहील.

जिल्हाधिकारी कार्यालय,
9 मार्च 1994
शाखा-
प्र.लि.नि.उ.जि. जिल्हाधिकारी

S.O. file

(2) वरील क्षेत्रात देय असलेल्या प्रोत्साहन भत्त्याचे दर पुढे दिल्याप्रमाणे राहतील :-

| | वेतनश्रेणी | दरमहा रुपये |
|---|---|---|
| मूळ वेतन रुपये | 950/- पेक्षा कमी | 100/- |
| | 950/- ते 1499 | 200/- |
| | 1500/- ते 1999 | 300/- |
| | 2000/- ते 2999 | 400/- |
| | 3000/- ते अधिक | 500/- |

(3) वरील दराप्रमाणे प्रोत्साहन भत्ता पुढील वर्गातील कर्मचा-यांना देय असेल :-

(अ) सर्व राज्य शासकीय कर्मचारी आणि अधिकारी.

(आ) जिल्हा परिषदांचे कर्मचारी आणि अधिकारी.

(इ) अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

(4) सदरहू प्रोत्साहन भत्ता अंशकालिक कर्मचारी व नैमित्तिक कामगार यांना अनुज्ञेय असणार नाही.

(5) सदरहू प्रोत्साहन भत्ता दिनांक 1 जानेवारी, 1994 पासून देय राहील व तो प्रारंभी आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यन्त म्हणजे 31 मार्च, 1997 पर्यन्त अंमलात राहील.

(6) प्रास्तावनेत क्रमांक-2 येथे उल्लेखित दिनांक 2 मे, 1992 च्या शासन निर्णयाव्दारे ज्या 1472 अतिदुर्गम गावांत कार्यरत असलेल्या कर्मचारी आणि अधिका-यांकरीता प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे, त्यापैकी जी गावे वर क्रमांक (1) येथे उल्लेखित आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नसतील त्या गावांतील कर्मचारी आणि अधिका-यांना वरील दरानेच प्रोत्साहन भत्ता देय राहील. त्यासाठी उप परिच्छेद (3)मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले कर्मचारी व अधिकारी पात्र राहतील.

5. ज्या कर्मचा-यांचे/अधिका-यांचे सध्याचे वेतन व भत्ते योजनांतर्गत तरतुदीतून भागविले जातात त्यांच्या प्रोत्साहनपर भत्त्याचा खर्च योजनांतर्गत मानून तो संबंधित विभागाच्या योजनांतर्गत तरतुदीमधून भागविण्यात यावा व तो आदिवासी उपयोजनेवरील खर्च म्हणून समजण्यात यावा. मात्र ज्या कर्मचा-यांचे/अधिका-यांचे सध्याचे वेतन व भत्ते योजनेतर तरतुदीमधून भागविले जातात त्यांच्या प्रोत्साहनपर भत्त्याचा खर्च हा संबंधित विभागाच्या योजनेतर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

6. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.5) मधील कलम, 248 च्या परंतुका अन्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असा आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांकडील कर्मचा-यांना/अधिका-यांना सदर आदेश योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात येत आहेत.

7. वरील बाबीवरील होणारा खर्च हा संबंधित कर्मचा-यांचे/अधिका-यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली वर्ग केले जातात त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व त्या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

8. हे आदेश वित्त विभागाच्या संमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक 1028/93/सेवा-5, दिनांक 28 डिसेंबर, 1993 अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. द. कुलकर्णी,
सह सचिव.

-५e

प्रति,

महालेखापाल-1 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-2 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-1 (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-2 (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
मंत्री/राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई,
उच्च व तंत्रशिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
नगरविकास विभाग, युडी-10, मंत्रालय, मुंबई,
कृषि व पदुम विभाग,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.261, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, व्दारा-तंत्र शिक्षण संचालक, मुंबई,
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/ठाणे/अमरावती,
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-1,
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प,
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे,
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग),
सहनिबंधक, सहकारी संस्था, आदिवासी विकास, नाशिक,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (या शासन निर्णयास पुरेशी प्रसिध्दी देण्याबाबत),
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन-15, आदिवासी विकास विभाग.

Ratnagiri
Zilla Sainik Board
Collector and President

BOOK-POST

बम्बई
BOMBAY
25 III 94
भारत INDIA
RUPEES
01.00
K